SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– 2609102, 2609103

Estd.1962
NAAC 'A' Grade

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/205 दि. 11/11/2019

**महत्वाचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख
सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषयः– विद्यापीठ परीक्षेबाबत.**

महोदय/महोदया,

शिवाजी विद्यापीठामार्फत प्रतिवर्षी विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षा आयोजित करण्यात येत असतात. सदर परीक्षेच्या कामकाजामध्ये सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा सहभाग उत्कृष्ट असल्याने सर्व परीक्षा व्यवस्थितपणे व गोपनीय पध्दतीने पार पाडल्या जातात याचा मला अभिमान वाटतो. त्याबद्दल विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने आपणा सर्वांना धन्यवाद देतो.

राजेश अग्रवाल समितीच्या शासनमान्य शिफारशीनुसार ई–मोडद्वारे (SRPD) प्रश्नपत्रिका वितरणाचे कामकाज ऑक्टोबर 2012 च्या परीक्षापासुन सुरू केलेले आहे. आजतागायत ई–मोडद्वारे (SRPD) प्रश्नपत्रिका वितरणाची व्याप्ती वाढवून एकूण 484 अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका ई–मोडद्वारे प्रत्येक परीक्षा केंद्रावर वितरित केल्या जातात. त्यामुळे परीक्षा कामकाजामध्ये गोपनीयता, सुसुत्रता, पारदर्शकता आली आहे.

तथापि, अद्यापी काही परीक्षा केंद्रावरील परीक्षेसाठी नियुक्ती केलेले शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी परीक्षेचे कामकाज करतांना जबाबदारी टाळत असल्याचे निर्दशनास येत आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मधील तरतुदीनुसार परीक्षेचे कामकाज पारदर्शीपणे योग्य त्या पध्दतीने पार पाडणे ही परीक्षेशी संबधीत सर्व प्राचार्य/शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांची जबाबदारी आहे. तसेच प्राचार्य, परीक्षा प्रमुख यांनी विशेषतः SRPD मधील गोपनीयता, परीक्षा केंद्रावरील गैरप्रकार व मूल्यमापन कामी सहकार्य इत्यादी बाबीवर व्यक्तीशः लक्ष देणे आवश्यक आहे.

सबब, ऑक्टो./नोंव्हे. 2019 मधील हिवाळी सत्रातील परीक्षा सुरू झालेल्या आहेत. सदर परीक्षेकरीता विद्यापीठाकडून/महाविद्यालयाकडून ज्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांना परीक्षेच्या कामाकरीता नियुक्ती करण्यात येईल अशा शिक्षक /शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीक्षेचे कामकाज पारदर्शीपणे पार पाडणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत परीक्षेच्या कामकाजातील गोपनीयता व पावित्र्य यामध्ये भंग होणार नाही याची कटाक्षाने काळजी घेणेची आहे. अन्यथा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल तसेच परीक्षेच्या कामाकाजामध्ये होणार प्रमाद हा आय.टी ॲक्ट 2008/2015 कलम 66 ते 72 नुसार दखलपात्र, अजामीन गुन्हा व दंडनीय अपराध आहे.

आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/अधिविभागातील विद्यापीठीय परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी संबंधीत प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख यांनीही सक्रीय सहभाग घेण्यात यावा.

(ग. र. पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ